Q.2 - 1/2/3/ = 2 marks

**1S4** **DD1**

**D.El.Ed. Examination**

**JUNE, 2018**

# MODEL ANSWER AND SCHEME OF MARKING

**Second Year (2016 Revised Syllabus)**

**PROFICIENCY IN MARATHI (Part-II)**

**Time : 3.00 to 4.00 Hrs.**

**Date : 5/6/2018** **(10 Pages)** **Max. Marks : 20**

1. 'अ' आणि 'ब' गटातील शब्दांच्या योग्य जोड्या लावा :

| | 'अ' गट | 'ब' गट | |
|---|---|---|---|
| (1) | शिलालेख | लेण्या | 1 |
| (2) | साहित्य | संपादन | 1 |
| (3) | लेखन प्रकार | परिच्छेद | 1 |
| (4) | व्यंजन | तालव्य | 1 |

2. खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी *60* ते *80* शब्दांत लिहा :

(1) **कथा पद्धतीचे फायदे :** 2

(1) हा साहित्य प्रकार लहानांपासून मोठ्यांपर्यन्त सर्वांचाच आवडता आहे.

(2) मनोरंजन होते आणि वेळेचा सदुपयोग होतो.

(3) मूल्य समजावून किंवा पटवून देता येते.

(4) कथेतून चांगला बोध होतो.

(5) नवीन अनुभव मिळतो.

(6) रसास्वाद घेता येतो.

(7) विविध प्रकारच्या कथांची माहिती मिळते.

(8) ज्ञान वाढतो, नवीन कल्पना, सर्जनशीलता वाढते, परिपूर्ण अनुभव मिळते.

(कोणतेही 4 मुद्दे 2 गुण)

(2) **जोडीवाचनाचे स्वरूप :** 2

- या वाचन प्रकारात मुले जोड्या करून वाचन करतात.
- एकावेळी एक जण वाचतो, तर दुसरा ऐकतो. श्रवण करणारा, वाचकाच्या जर चुका झाल्या तर मदत करतो, सुधारणा करतो. दिलेल्या मजकुराचे वाचन झाल्यानंतर जोडीदार वाचतो व त्याचा मित्र त्याला तशीच मदत करतो. मुले समवयस्क असल्याने एकमेकांच्या चुका हसत-खेळत स्वीकारतात, दुरुस्त्या करतात. अशा प्रकारच्या सरावाने 'प्रकट वाचन', अडखळत वाचतो ते सलग वाचतो. अशा प्रकारे जोडीवाचन करतो आणि शिक्षक सुलभकाचे काम करतात.

(स्वरूप 2 गुण)

(3) **सूचना लिहितांना लक्षात घ्यायच्या बाबी :** 2

(1) सूचना लिहिण्याचा हेतू.

(2) सूचना ज्या व्यक्तींसाठी आहे तो वयोगट.

(3) कोणती कृती करायची त्याचा स्पष्ट उल्लेख.

(4) कृतींच्या महत्त्वानुसार सूचनांचा क्रम.

(5) प्रत्येक पायरीवर एकच कृती वा विचार.

(6) निःसंदिग्ध स्पष्ट व नेमकी भाषा.

(7) काय करावे, काय करू नये.

(8) मोजक्या शब्दांचा वापर.

(9) आज्ञार्थी वाक्य रचना.

(10) आशयानुरूप विशिष्ट वाक्य रचना व भाषेचा वापर.

(कोणत्याही 8 सूचना 2 गुण)

**3.** खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी *120* ते *160* शब्दांत लिहा :

(1) **सारांश लेखनाचे उपयोग :** 3

(1) सारांश रूपाने माहितीचे संकलन केल्यास माहिती लक्षात ठेवणे सोपे जाते.

(2) योग्य वेळी संदर्भासाठी याच माहितीचा सहज उपयोग होतो.

(3) सारांश रूपात माहिती असल्याने आकलनास सोपी जाते.

(4) सहज लक्षात राहते.

(5) स्वयं-अध्ययनासाठी सारांश लेखन महत्त्वाचे ठरते.

(6) स्वयं अभ्यासाठी टिपण करण्यास उपयोगी.

(7) वृत्तलेखन, वृत्तान्त लेखन या प्रकारात सारांश लेखनाचे उपयोग होतो.

(कोणतेही 6 मुद्दयांना 3 गुण)

**किंवा**

**परिच्छेद लेखनाचे स्वरूप :**

परिच्छेद हा साहित्य लेखनाचा सर्वात लहान घटक आहे. एका मुद्द्यांची परिपूर्ण मांडणी परिच्छेदामध्ये केली जाते. कथा, कादंबरी, लेख, बातमी, स्तंभलेखन किंवा प्रश्नाचे उत्तर या सर्व पद्धतीच्या लेखनामध्ये मध्ये परिच्छेद हा अविभाज्य भाग असतो. मुद्देसूद व प्रभावी लेखनासाठी परिच्छेद लेखन आवश्यक असते, परिच्छेद मध्ये वाक्यांचा क्रम महत्त्वाचा असतो, परिच्छेदाची मांडणी तार्किक सुसंगतीवर आधारित असते. वाक्ये आशयानुरूप एकमेकांशी जोडलेली असतात. आकलनास सोपे होते. लेखन प्रभावी होते.

(परिच्छेद लेखन स्वरूप 3 गुण)

(2) परिचयपत्राचे प्रकार, बायोडाटाचा नमुना प्रकार : 3

(1) बायोडाटा – Bio-data

(2) करिक्युलम व्हायटे – Cirriculum Vitae

(3) रेझ्युमे – Resume

बायोडाटा (नमूना) :

(1) नाव

(2) वडिलांचे नाव

(3) आईचे नाव

(4) जन्म तारीख

(5) वय

(6) निवासाचा पत्ता :

(7) संपर्क क्रमांक

(8) ई-मेल

(9) शैक्षणिक पात्रता

| अ.क्र. | उत्तीर्ण परीक्षा | संस्थेचे नाव | उत्तीर्ण महिना व वर्ष | गुणांची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| | | | | |

(10) व्यावसायिक पात्रता

(11) विशेष गुणवत्ता

(12) छंद

(13) अवगत भाषा

(14) नागरिकत्व

(15) धर्म

(16) जात

तारीख

स्थळ

सही

(परिचयपत्र प्रकार—1 गुण, नमुना 2 गुण)

किंवा

व्याख्या :

संवाद म्हणजे—संप्रेषणासाठी आवश्यक असणारा संवाद हा तोंडी व श्राव्य प्रकार आहे तसेच लेखन प्रकार ही आहे कथा, कादंबरी, नाटक या मध्ये संवादलेखन होते म्हणजेच संवाद हा दोन किंवा दोनापेक्षा अधिक लोकांमध्ये होतो. संवाद हा संप्रेषण घडवून आणतो.

मराठी भाषेचे महत्त्व—संवाद नमूना (विद्यार्थी शिक्षक संवाद)

राजू (विद्यार्थी) – अरे! यार रामू ते पोहने को गया था क्या ?

रामू – भाई मैं तो अपने अंकल के गाँव गया था।

शिक्षक – मुलांनो तुम्ही हिंदी, मराठी, इंग्रजीची अगदी सरमिसळ केली आहे.

राजू – सर आजकाल अशाच भाषेचा वापर जास्त होतो ना.

शिक्षक – मुलांनो आपण आपल्या मातृभाषेचा वापर केला पाहिजे. आपण महाराष्ट्रात राहतो आपली मातृभाषा मराठी आहे त्याला कमी लेखू नका. मराठी भाषा संपूर्ण महाराष्ट्रात व सर्वक्षेत्रात बोलली जात आहे त्याचा अभिमान बाळगा.

विद्यार्थी – सॉरी सर ........ नाही (माफ करा) आम्ही आज पासून मराठी बोलणार. आपल्या भाषेचा आदर करणार धन्यवाद!

(संवाद माहिती 1 गुण, कोणताही संवाद नमूना 2 गुण)

4. **खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी *200* ते *250* शब्दांत लिहा :**

**वाचनाचे महत्व :** 4

(1) नवीन गोष्टींचा परिचय

(2) स्वसमृद्धीचा मार्ग

(3) आकलनशक्तीचा विकास

(4) थोर व्यक्तींच्या अनुभवाचा उपयोग

(5) आंतरक्रियेचे साधन

(6) कल्पनाशक्ती व सर्जनशीलता यांना उत्तेजन

(7) आनंदप्राप्ती

(8) वेळेचे सदुपयोग


**थोर व्यक्तींच्या अनुभवाचा उपयोग :**

समाजामध्ये उद्योगपती, शास्त्रज्ञ, लेखक, कवी अशा प्रथितयश व्यक्तींच्या यशोगाथा व चरित्र वाचकाला मार्गदर्शन करीत असतात. इतिहासातील थोर व्यक्तींच्या चरित्रातून त्यांचे अनुभव

वाचकाला दिशादर्शक ठरतात. वाचकाला कोणत्या चुका टाळायला हव्यात, कोणते मार्ग टाळायला हवेत हे कळते पहिल्या प्रयत्नात यश मिळतेच असे नाही. अपयशाचा पण सामना करावा लागतो हे शिकता येते. लेखक, कवी त्यांच्या पुढील पिढ्यांना अधिक भावतात. वाचनातून उत्तम सल्ला मिळतो. 'Ignite Your Mind' हा अब्दुल कलामांचा संदेश विद्यार्थ्यांना कृतिशील होण्यास प्रेरणादायी आहे.

(वाचनाचे महत्त्व 2 गुण, अनुभवांचा उपयोग 2 गुण)

**किंवा**




**चित्रवाचनाचे उपयोग :**

वाचन कौशल्य आत्मसात करतांना अध्ययन-अध्यापनात एकलचित्र, प्रसंगचित्र, चित्रमालिका वाचनचा खूप उपयोग होतो.

उदाहरणार्थ–स्वयंपाक घरातील चित्र दाखवून त्याचे निरीक्षण करण्यास सांगून त्याचे वर्णन करायला सांगता येते. मुलांच्या अनुभवविश्वानुसार ते चित्राचे वर्णन करतात त्यामुळे त्यांचे वाचन आणि वर्णन कौशल्यांचा विकास होतो. मुलांची आकलन शक्ति, कल्पना शक्ती, निरीक्षण शक्तींचा विकास होतो, विद्यार्थी चित्रमालिकेचे सुद्धा वर्णन करतात. शब्द आणि चित्र यांचे साहचर्याने वाचन करून, अर्थबोध होतो. चित्रवाचनाचा मुलांना खूप उपयोग होतो.

(वाचन प्रकार 2 गुण, चित्र वाचन उपयोग 2 गुण)